Prepp
Your Personal Exams Guide

# सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस भरती
## दि. 8 मे 2017

1. एक काम अ हा 10 दिवसात करतो,तेच काम ब 15 दिवसात करतो. दोघे मिळून तेच काम किती दिवसात पूर्ण करतील ?
   1) 5 दिवस 2) 6 दिवस 3) 7 दिवस 4) 8 दिवस
2. राजू खेळत आहे. वाक्याचा काळ ओळखा.
   1) साधा वर्तमानकाळ 2) अपूर्ण वर्तमानकाळ
   3) पूर्ण वर्तमानकाळ 4) रिती वर्तमानकाळ
3. पुढील वाक्यातून काळाचा कोणता अर्थ व्यक्त होतो ? मुलांनो रांगेत उभे राहा.
   1) स्वार्थ 2) आज्ञार्थ 3) विध्यर्थ 4) संकेतार्थ
4. क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला.......... म्हणतात.
   1) विशेषण 2) शब्दयोगी अव्यय
   3) उभयान्वयी अव्यय 4) क्रियाविशेषण अव्यय
5. अबब! केवढा मोठा साप! या वाक्यात शब्दाची कोणती जात वापरली आहे ?
   1) उभयान्वयी अव्यय 2) शब्दयोगी अव्यय
   3) क्रियाविशेषण अव्यय 4) केवलप्रयोगी अव्यय
6. कर्तरी प्रयोगात कर्ता नेहमी........ असतो.
   1) प्रथमान्त 2) द्वितीयांत 3) तृतीयांत 4) चतुर्थांत
7. कांदेपोहे,पुरणपोळी,गुळांबा हे शब्द तत्पुरुष समासाच्या कोणत्या उपप्रकारात मोडतात ?
   1) विभक्ती तत्पुरुष 2) कर्मधारय
   3) मध्यमपदलोपी 4) उपपद तत्पुरुष
8. अर्थदृष्टया समासाची दोन्ही पदे महत्वाची असल्यास कोणता समास होतो ?
   1) द्वंद्व 2) तत्पुरुष 3) अव्ययीभाव 4) बहुव्रीही
9. खालीलपैकी कोणता शब्द देशी नाही ?
   1) बोका 2) रेडा 3) बटाटा 4) बाजरी
10. जे चकाकते ते सोने नसते. या वाक्याचा प्रकार ओळखा.
   1) केवलवाक्य 2) मिश्रवाक्य 3) संयुक्त वाक्य 4) यापैकी नाही
11. 'पाणी पाजणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ सांगा
   1) उत्साह भंग करणे 2) पराभव करणे
   3) अपमान करणे 4) माघार घेणे
12. 'समुद्र' या शब्दाचा समानार्थी नसणारा शब्द कोणता ?
   1) सागर 2) रत्नाकर 3) सिंधू 4) समीकरण
13. 'तळे' या शब्दाचे अनेकवचन करा.
   1) तळे 2) तळी 3) तळ्या 4) तलाव
14. पुढील पोलीस अधिकाऱ्यांच्या पदश्रेणीवर योग्य तो चढत्या क्रमांकाचा पर्याय निवडा.
   1) API-PSI-PI-ASI 2) PI-API-ASI-PSI
   3) ASI-PSI-API-PI 4) PSI-ASI-PI-API
15. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय कोठे आहे ?

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1-2 | 2-2 | 3-2 | 4-4 | 5-4 | 6-1 | 7-3 | 8-1 | 9-3 | 10-2 |
| 11-2 | 12-4 | 13-2 | 14-3 | 15-2 | | | | | |

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

Prepp
Your Personal Exams Guide

1) दिल्ली 2) मुंबई 3) नागपूर 4) पुणे

16. महाराष्ट्र विधानसभेत निवडून आलेले किती सदस्य असतात ?
1) 278 2) 288 3) 378 4) 388

17. सिंधुदुर्ग जिल्ह्यात खालीलपैकी कोठे नगरपरिषद नाही ?
1) वेंगुर्ला 2) मालवण 3) देवगड 4) सावंतवाडी

18. खालीलपैकी कोणी ऑलंपिक मध्ये पदक मिळविले नाही ?
1) दिपा कर्माकर 2) पी.व्ही.सिंधू 3) साक्षी मलीक 4) कर्णम मल्लेश्वरी

19. खालीलपैकी राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार-2016 कोणाला मिळाला नाही ?
1) दिपा कर्माकर 2) जितू रॉय 3) विराट कोहली 4) साक्षी मलीक

20. सध्या आयपीएल मध्ये महाराष्ट्राचे किती संघ खेळतात ?
1) 1 2) 2 3) 3 4) 4

21. किशोरी आमोनकर खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?
1) कथ्थक 2) भरतनाट्यम 3) हिंदुस्थानी संगीत 4) कर्नाटकी संगीत

22. 2017 च्या 64 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांत सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे सुवर्णकमळ कोणत्या चित्रपटास मिळाले ?
1) कासव 2) पिंक 3) निरजा 4) व्हेंटीलेटर

23. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे पोलीस महासंचालक कोण आहेत ?
1) दत्ता पडसलगीकर 2) संजीव दयाळ
3) प्रवीण दिक्षित 4) सतिश माथूर

24. सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल कोण आहेत ?
1) एस.एम.कृष्णा 2) सी.विद्यासागर राव
3) पी.सी.अलेक्झांडर 4) के.शंकरनारायणन

25. मुंबई-गोवा महामार्गाचा नवीन क्रमांक काय आहे ?
1) NH4 2) NH54 3) NH66 4) NH10

26. लोकमान्य टिळक यांनी कोणते वृत्तपत्र सुरु केले ?
1) केसरी 2) यंग इंडिया 3) युगांतर 4) सुधाकर

27. तिलारी धरण सिंधुदुर्गच्या कोणत्या तालुक्यात आहे ?
1) सावंतवाडी 2) वेंगुर्ला 3) दोडामार्ग 4) कणकवली

28. खालीलपैकी कोणती रेल्वे मुंबई-गोवा रेल्वे मार्गावरुन धावत नाही.
1) कोकणकन्या एक्सप्रेस 2) मत्सगंधी एक्सप्रेस
3) महाराष्ट्र एक्सप्रेस 4) राज्यराणी एक्सप्रेस

29. फळ व त्यासाठी प्रसिद्ध असणारी गावे यांची चुकीची जोडी ओळखा.
1) द्राक्ष-नाशिक 2) देवगड-आंबा 3) वेंगुर्ला-काजू 4) बाळगाव-डाळिंब

30. मुलभुत हक्कांशी संबंधित राज्यघटनेचे कलम कोणते ?
1) 1 2) 13 3) 36 4) 50

31. केंद्रीय अर्थमंत्री कोण आहेत ?
1) नरेंद्र मोदी 2) पियुष गोयल 3) अरुण जेटली 4) राजनाथ सिंग

32. पंचायतराजचा घटनात्मक दर्जा देणारी घटनादुरुस्ती कोणती आहे ?
1) 70 2) 71 3) 72 4) 73

33. खालीलपैकी कोणती नदी गंगा नदीची उपनदी आहे ?
1) यमुना 2) कोसी 3) इंद्रावती 4) शोण

34. खालीलपैकी कोणता माशाचा प्रकार नाही ?
1) चातक 2) कोळंबी 3) बोंबील 4) काणे

35. 2017 अंडर 17 फिफा वर्ल्ड कप (फुटबॉल) कोठे आयोजित केला जाणार आहे ?
1) इंग्लंड 2) जर्मनी 3) इंडिया 4) फ्रान्स

36. 2020 चे उन्हाळी ऑलंपिक कोठे होणार आहेत ?
1) रिओ 2) टोकियो 3) नवी दिल्ली 4) पॅरीस

37. उसेन बोल्ट हा खेळाडू कोणत्या आंतरराष्ट्रीय क्रिडा प्रकारातील प्रसिद्ध खेळाडू आहे ?
1) क्रिकेट 2) फुटबॉल 3) स्विमींग 4) अॅथेलेटिक्स

38. खालीलपैकी पद्मविभुषण पुरस्कार कोणाला मिळाला आहे ?
1) अनुपम खेर 2) शरद पवार 3) अण्णा हजारे 4) कनवल सिब्बल

39. जीवनसत्वा अभावी होणाऱ्या आजारांबाबत चुकीची जोडी ओळखा.
1) अ जीवनसत्व-रातांधळेपणा 2) ब जीवनसत्व-बेरीबेरी
3) क जीवनसत्व-स्कर्वी 4) ड जीवनसत्व-कावीळ

40. बाईल ज्युस पित्त कोठे निर्माण होते ?
1) जठर 2) यकृत 3) स्वादुपिंड 4) आतडे

41. चुकीची जोडी ओळखा.
1) मेघालय-कोहिमा 2) आसाम-दिसपूर
3) मणीपूर-इम्फाळ 4) अरुणाचल प्रदेश-इटानगर

42. खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.
1) बायचुंग भुतीया-फुटबॉल 2) जीतू रॉय-बुध्दीबळ
3) विकास गौडा-थाळी फेक 4) सायना नेहवाल-बॅडमिंटन

43. मीठाचे रेणूसुत्र काय आहे ?
1) Nacl 2) HCL 3) $H_2O$ 4) KCL

44. खालीलपैकी कोणते किरणोत्सारी मूलद्रव्य नाही ?
1) थोरियम 2) युरेनियम 3) रेडियम 4) सोडियम

45. खालीलपैकी कोणती ऑपरेटींग सिस्टीम नाही ?
1) जावा 2) अॅन्ड्रॉईड 3) लिनेक्स 4) विंडोज

46. खालीलपैकी चुकीची जोडी कोणती ?
1) मार्क झुकरबर्ग-फेसबुक 2) सत्या नडेला-मायक्रोसॉफ्ट
3) सुंदर पिचाई-व्हॉटस अप 4) टिम कुक-अॅपल

47. खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.
1) अझिम प्रेमजी-विप्रो 2) नारायण मूर्ती-इन्फोसिस
3) इंद्रा नुई-बायोकान 4) दिपक पारेख-एच.डी.एफ.सी

48. स्टेट बँक ऑफ इंडियाचे सध्याचे चेअरमन कोण आहेत ?
1) रघुराम राजन 2) उर्जित पटेल
3) अरुंधती भट्टाचार्य 4) चंदा कोचर

49. नटसम्राट या सुप्रसिध्द नाटकाचे लेखक कोण आहेत ?
1) कुसुमाग्रज 2) गोविंद देवल
3) राम गणेश गडकरी 4) विजय तेंडुलकर

50. भारताचा राष्ट्रीय खेळ कोणता आहे ?
1) कबड्डी 2) व्हॉलीबॉल 3) क्रिकेट 4) हॉकी

51. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी खालीलपैकी कोणते पुस्तक लिहिले नाही ?
1) हिंदू-जगण्याची समृध्द अडगळ 2) हूल 3) कोसला 4) महानायक

52. 2016 च्या रिओ ऑलिम्पीकमध्ये 3000 मीटरच्या स्टिपलचेस

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16-2 | 17-3 | 18-1 | 19-3 | 20-2 | 21-3 | 22-1 | 23-4 | 24-2 | 25-3 | 26-1 | 27-3 | 28-3 | 29-4 | 30-2 | 31-3 | 32-4 | 33-3 | 34-1 |
| 35-3 | 36-2 | 37-4 | 38-2 | 39-4 | 40-2 | 41-1 | 42-2 | 43-1 | 44-4 | 45-1 | 46-3 | 47-3 | 48-3 | 49-1 | 50-4 | 51-4 | | |

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

स्पर्धेत अंतिम फेरीत भाग घेतलेली ललीता बाबर ही खेळाडू मूळ कोणत्या जिल्ह्याची आहे ?


1) सिंधुदुर्ग 2) सांगली 3) सातारा 4) कोल्हापूर

53. अमेरिकेचे नवनियुक्त राष्ट्रपती खालीलपैकी कोण आहेत ?

1) हिलरी क्लिंटन 2) बराक ओबामा 3) जॉर्ज बुश 4) डोनाल्ड ट्रम्प

54. $A + B = 10$, $A - B = 2$, $A^2 - B^2 = ?$

1) 30 2) 40 3) 20 4) 80

55. 


क्षेत्रफळ काढा?

1) 2400 चौसेमी 2) 1000 चौसेमी 3) 600 चौसेमी 4) 1200 चौसेमी

56. एका वर्तुळाची त्रिज्या 14 सेमी आहे. तर त्याचा परिघ किती असेल?

1) 168 सेमी 2) 88 सेमी 3) 140 सेमी 4) 280 सेमी

57. रमेश गोव्याहून मुंबईला 60 किमी. ताशी वेगाने जात आहे. सुरेश त्याचवेळी मुंबईहून गोव्याला तशी 120 किमी. वेगाने येत आहे. गोवा व मुंबईचे अंतर 600 किमी. आहे दोघांनी एकाच वेळी न थांबता प्रवास केल्यास किती वेळाने त्यांची भेट होईल ?

1) 100 मिनिटे 2) 200 मिनिटे 3) 300 मिनिटे 4) 400 मिनिटे

58. 0,3,8,15,?,35 रिकाम्या जागा भरा.

1) 21 2) 22 3) 24 4) 30

59. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द ओळखा.

1) चिवला 2) शिरोडा 3) तारकर्ली 4) दुर्ग

60. चर्पट पंजरी या शब्दाचा अर्थ सांगा ?

1) फुकटाचे श्रम 2) प्राणायम 3) शत्रुत्व 4) निरर्थक बडबड

61. म्हणीचा अर्थ ओळखा. इकडे आड तिकडे विहीर.

1) आपल्या ऐपतीप्रमाणे खर्च करावा

2) कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच

3) दोन्हीकडून सारख्याच अडचणीत सापडणे

4) सर्वत्र सारखीच परिस्थिती असणे

62. वाक्याचा अर्थ पूर्ण झाल्यास कोणते विरामचिन्ह वापरतात ?

1) पूर्णविराम 2) स्वल्पविराम 3) अर्धविराम 4) अपसारणचिन्ह

63. केलेले उपकार न जाणणारा..........

1) कृतघ्न 2) कृतज्ञ 3) मनकवडा 4) कृपाळु

64. संधी सोडवा. प्रति+अक्ष

1) प्रत्यक्ष 2) प्रतीक्ष 3) प्रत्याक्ष 4) प्रत्येक्ष

65. धैर्य,कीर्ती,आनंद हे नामाचे कोणते प्रकार आहेत ?

1) विशेषनाम 2) सामान्यनाम 3) भाववाचक नाम 4) सर्वनाम

66. 'उंट' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द कोणता ?

1) उंटणी 2) उंटीण 3) सांडणी 4) सर्वच बरोबर

67. 'जळू' या शब्दाचे अनेकवचन करा.

1) जळवा 2) जळे 3) जळू 4) जळूया

68. स,ला,ते,-स,ला,ना,ते हे प्रत्यय कोणत्या विभक्तीचे आहेत ?

1) प्रथमा 2) तृतीया 3) चतुर्थी 4) पंचमी

69. 'भाऊ' या शब्दाचे सामान्यरूप करा.

1) भाऊ 2) भावा 3) दोन्ही बरोबर 4) दोन्ही चूक

70. खालीलपैकी आत्मवाचक सर्वनाम कोणते आहे ?

1) ती 2) हा 3) कोण 4) स्वतः

71. रामचे अक्षर सुंदर आहे. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

1) भाववाचक नाम 2) विशेषण 3) क्रियाविशेषण 4) शब्दयोगी अव्यय

72. आदित्य आंबा खातो. या वाक्यातील कर्ता ओळखा.

1) आदित्य 2) आंबा 3) खातो 4) अकर्मक वाक्य

73. तीन रस्ते एकत्र येतात ती जागा..........

1) तट 2) चावडी 3) चौक 4) तिठा

74. आता मला चालवते. या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

1) प्रयोजक क्रियापद 2) शक्य क्रियापद 3) अनियमित क्रियापद 4) भावकर्तृक क्रियापद

75. अ व ब हे दोन नळ एक बादली अनुक्रमे 12 मिनिटांत व 15मिनिटांत भरतात दोन्ही नळ एकाच वेळी सुरु करुन केल्यास बादली भरण्यास किती वेळ लागेल ?

1) 6 मिनिट 40 सेकंद 2) 8 मिनिट 25 सेकंद 3) 7 मिनिट 15 सेकंद 4) 7 मिनिट 25 सेकंद

76. सिंधुदुर्ग किल्ला बांधला गेला. सन.......

1) सन 1664 2) सन 1674 3) सन 1684 4) सन 1694

77. खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याची सिमा सिंधुदुर्ग जिल्ह्याला लागत नाही ?

1) बेळगाव 2) कोल्हापूर 3) रत्नागिरी 4) रायगड

78. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये किती पोलीस स्टेशन आहेत ?

1) 11 2) 13 3) 15 4) 17

79. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानांमध्ये चुकीची जोडी ओळखा.

1) पेशवा-पंतप्रधान 2) अमात्य-वित्तमंत्री 3) पंडितराव-मुख्य न्यायाधीश 4) सुमंत-परराष्ट्र मंत्री

80. पेशव्यांचा कोणता क्रम बरोबर आहे ?

1) बाजीराव 1, बाळाजी बाजीराव, बाळाजी विश्वनाथ, नानासाहेब

2) बाळाजी बाजीराव, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव 1, नानासाहेब

3) नानासाहेब, बाळाजी बाजीराव, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव 1

4) बाळाजी विश्वनाथ, बाजीराव 1, बाळाजी बाजीराव, नानासाहेब

81. विजयदुर्ग, जिल्हा सिंधुदुर्ग येथे हेलियम या वायूचा शोध लागला. हेलियम दिन कधी पाळला जातो ?

1) 18 मार्च 2) 18 मे 3) 18 ऑगस्ट 4) 18 डिसेंबर

82. देवेंद्र फडणवीस हे स्वतंत्र महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान होणारे कितवे मुख्यमंत्री आहेत ?

1) 15 वे 2) 16 वे 3) 17 वे 4) 18 वे

83. मराठ्यांचे पहिले आरमार प्रमुख कोण आहे ?

1) कान्होजी आंग्रे 2) तुळोजी आंग्रे 3) मालोजी आंग्रे 4)येसाजी आंग्रे

84. रेडी हे बंदर कोणत्या तालुक्यात आहे ?

1) मालवण 2) वेंगुर्ला 3) कुडाळ 4) सावंतवाडी

85. $17\frac{3}{4} = ?$

1) $\frac{69}{4}$ 2) $\frac{71}{4}$ 3) $\frac{73}{4}$ 4) $\frac{75}{4}$

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 52-3 | 53-4 | 54-3 | 55-3 | 56-2 | 57-2 | 58-3 | 59-4 | 60-4 | 61-3 | 62-1 | 63-1 | 64-1 | 65-3 | 66-3 | 67-1 | 68-3 | 69-2 | 70-4 |
| 71-2 | 72-1 | 73-4 | 74-2 | 75-1 | 76-1 | 77-4 | 78-2 | 79-3 | 80-4 | 81-3 | 82-4 | 83-1 | 84-2 | 85-2 | | | | |

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

Prepp
Your Personal Exams Guide

86. एका चौरसाची बाजू 4 सेमी आहे तर त्या चौरसाचे क्षेत्रफळ किती असेल ?

1) 16 चौसेंमी 2) 8 चौसेंमी 3) 20 चौसेंमी 4) 32 चौसेंमी

87. 1200 लोक ज्यात कॅप्टन आणि जवान आहेत, एक ट्रेन ने प्रवास करतात, त्यात प्रत्येक 15 जवानांसाठी 1 कॅप्टन आहे. तर किती कॅप्टन ट्रेनने प्रवास करीत आहेत ?

1) 85 2) 80 3) 75 4) 70

88. एका कुटुंबात वडिलांनी केकचा 1/4 भाग खाल्ला, त्यांनी कुटुंबाचा प्रत्येक सदस्य जितका केक खाईल त्यापेक्षा तिप्पट जास्त केक खाल्ला. तर कुटुंबातील सदस्यांची संख्या किती ?

1) 3 2) 7 3) 10 4) 12

89. खालीलपैकी कोणती मूळ संख्या नाही ?

1) 41 2) 43 3) 49 4) 53

90. A,C,F,J,O,? पूर्ण करा.

1) S 2) T 3) V 4) U

91. A,C,F,H,K,M, ? मालिका पूर्ण करा.

1) P,S 2) O,P 3) P,R 4) U,W

92. 2,5,11,20,32,47,?

1) 68 2) 164 3) 62 4) 65

93. संगणकाची साठवण क्षमतेचा कोणता चढता क्रम बरोबर आहे ?

1) MB,GB,KB,TB 2) TB,MB,GB,KB
3) KB,MB,GB,TB 4) KB,TB,MB,GB

94. मालिका पूर्ण करा. 17,26,37,50,?

1) 63 2) 64 3) 65 4) 66

95. राम व त्याच्या आईचे वय 2:7 या प्रमाणात आहे. आणखी 8 वर्षांनी त्यांच्या वयाचे गुणोत्तर 2:5 या प्रमाणात होईल, तर रामच्या आईचे आजचे वय किती ?

1) 42 वर्ष 2) 50 वर्ष 3) 28 वर्ष 4) 34 वर्ष

96. 7,10,8,11,9,12,? मालिका पूर्ण करा.

1) 7 2) 10 3) 12 4) 13

97. निलेश जवळ एक हेक्टर जमीन होती. त्याने एक एकर मोठ्या मुलाला दिली. तर 40 गुंठे जमीन लहान मुलाला दिली, तर निलेशजवळ किती एकर जमीन शिल्लक राहिली ?

1) 1/2 एकर 2) 1 एकर 3) 1.1/2 एकर 4) निरंग

98. एक मैल म्हणजे किती कि.मी. अंतर असते ?

1) 1.6 कि.मी. 2) 2.6 कि.मी. 3) 1.5 कि.मी. 4) 2.5 कि.मी.

99. 1996 ची सुरुवात सोमवारने झाली असेल, तर 1999 ची सुरुवात कोणत्या वारने होईल ?

1) गुरुवार 2) शुक्रवार 3) शनिवार 4) रविवार

100. एका बोटीचा वेग ताशी 6 किमी.असून, प्रवाहाचा वेग 2 किमी. ताशीआहे. बोट प्रवाहाच्या विरुध्द दिशेने जात आहे, तर त्यास 4 तास लागतात, प्रवाहाच्या दिशेने तेच अंतर पार करण्यासाठी किती वेळ लागेल ?

1) 4 तास 2) 3 तास 3) 2 तास 4) 1 तास

86-1 87-3 88-3 89-3 90-4 91-3 92-4 93-3 94-3 95-1 96-2 97-1 98-1 99-2 100-3

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER